कोषागारातून रोख देय अनुदान

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा)
अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक
वर्षासाठी अनुसुचित जाती उपयोजना
घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान
वितरीत करण्याबाबत
(लेखाशीर्ष २२१५ ९८२६)

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.४८४ /पापु-१६

७ वा मजला,जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: १४ मार्च,२०१९.

वाचा-

१) **केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्र :** एस-१२०११/७/२०१५-एसबीएम,दि.२५/०७/२०१८
२) **वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:** अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२/०४/२०१८
३) **वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक:** ३७४/अर्थोपाय, दि.०३/०८/२०१८
४) **वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक:** ६०/२०१९/व्यय-३, दि.१४/०२/२०१९.
५) **शासन निर्णय क्रमांकः** स्वभामि २०१८/प्र.क्र.४८४ /पापु-१६, दि. २९ ऑक्टोबर,२०१८.
६) **वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः** अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५/०१/२०१९

प्रस्तावना -

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती उपयोजना घटकासाठी २२१५ ९८२६ या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरीता केंद्र हिश्याचा रु.१७२८७.०३लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आला असून तो पूर्णपणे अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर योजनेकरिता अनुसूचीत जाती उपयोजना घटकासाठी २२१५ ९८२६ या लेखाशीर्षाखाली नोव्हेंबर,२०१८च्या (हिवाळी) अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे एकूण रूपये २११३८.१० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सुधारित अंदाजात सदर योजनेंतर्गत अनुसूचीत जाती उपयोजना घटकासाठी २२१५ ९८२६ या लेखाशीर्षाखाली

रू.३८४२५.१३लक्ष (रू. तीनशे चौ-याऐंशी कोटी पंचवीस लक्ष तेरा हजार) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. उक्त वाचा क्र.१ येथील केंद्र शासनाच्या मंजूरी आदेशान्वये रु.२८९०४.२८ लक्ष (रू.दोनशे एकोण्णवद कोटी, चार लक्ष, अठ्ठावीस हजार फक्त) इतके अनुदान केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेकरिता अनुसूचीत जाती उपयोजना घटकासाठी २२१५ ९८२६ या लेखाशीर्षाखाली राज्यास प्राप्त झाले आहे. वाचा क्र.२ अन्वये सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याबाबत वित्त विभागाने कळविले आहे. उपरोक्त वाचा क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सदर रु.२८९०४.२८लक्ष मधून रू.१०६६४.९८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला असून उर्वरीत १८२३९.३०लक्ष (रू.एकशे ब्याऐंशी कोटी एकोणचाळीस लक्ष तीस हजार) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती उपयोजना घटकासाठी केंद्र हिश्याकरिता सुधारित अंदाजानुसार रू.३८४२५.१३लक्ष (रू.तीनशे चौ-याऐंशी कोटी पंचवीस लक्ष तेरा हजार) एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या आहे. उपरोक्त वाचा क्र.१ येथील केंद्र शासनाच्या मंजुरी आदेशान्वये रु.२८९०४.२८ लक्ष (रू.दोनशे एकोण्णवद कोटी, चार लक्ष, अठ्ठावीस हजार फक्त) इतके अनुदान राज्यास प्राप्त झाले असून सदर अनुदान अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. वाचा क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सदर रु.२८९०४.२८लक्ष निधीतून रू.१०६६४.९८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरीत १८२३९.३० लक्ष (रु.२८९०४.२८लक्ष - रू.१०६६४.९८ लक्ष) इतका निधी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था यांच्या अधिनिस्त ठेवण्यात येत आहे.

राज्यस्तरावर संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेली रू.१८२३९.३०लक्ष (रू.एकशे ब्याऐंशी कोटी एकोणचाळीस लक्ष तीस हजार फक्त) इतकी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रू.१८२३९.३०लक्ष (रू.एकशे ब्याऐंशी कोटी एकोणचाळीस लक्ष तीस हजार) इतका निधी अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एल.ए.जाधव), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (श्री.अभय महाजन), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एल.ए.जाधव), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी रू.१८२३९.३०लक्ष (रू. एकशे ब्याऐंशी कोटी एकोणचाळीस लक्ष

तीस हजार) इतकी रक्कम अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून स्वतंत्र धनादेशान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर अनुदान सशर्त मंजूर करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेले अनुदान ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच कारणासाठी खर्च करण्यात यावे. संबंधित संस्थेने या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेला निधी, या कार्यक्रमासाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करावा.

आ) संबंधित संस्थेने या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च करू नये.

इ) अट क्र. अ आणि आ यांची पुर्तता झाली आहे याची खात्री करण्यासाठी, महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी लेखे तपासणीसाठी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

ई) सदर रक्कम केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार तसेच या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे/ आदेशाप्रमाणे खर्च करण्यात यावी.

उ) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा विहित नमुन्यातील मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास पाठविण्याची दक्षता घ्यावी. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेप्रमाणे जिल्हा परिषदांनी या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित कालावधीत या विभागातील पापु-०४, पापु-१६ व पापु-२० या कार्यासनांस सादर करावा.

ऊ) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी निधी वितरण, खर्च याबाबतची नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) घेण्याची दक्षता घ्यावी.

ऋ) सदर रक्कम खर्च करताना वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि.०२ एप्रिल,२०१८ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक बाबींची पुर्तता करून कार्यपूर्ती अहवाल/नमूद प्रमाणपत्रे शासनास त्वरीत सादर करावीत.

ऌ) सदर तरतुद अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या लाभार्थ्यांकरीताच खर्च होईल,याची दक्षता घ्यावी.

ऍ) सदर रक्कम खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास त्वरीत सादर करावे.

ऐ) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत जिल्हा परिषदांना प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा वितरीत करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची राहील.

०२. हा खर्च "मागणी क्रमांक वाय-०२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता, १०७ मलप्रणाल सेवा, (०२) ग्रामसफाई कार्यक्रम, (०२) (९) निर्मल भारत अभियानांतर्गत शौचालयाचे बांधकाम,केंद्र पुरस्कृत योजना (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा) (२२१५ ९८२६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशीर्षाखाली घालावा.

०३. सदर शासन निर्णय व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल,२०१८ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ६ ते १० मधील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ८ मधील तपासणी सूचीतील १ ते १० अटींची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे. उपरोक्त रु.२८९०४.२८ लक्ष (रू.दोनशे एकोण्णवद कोटी, चार लक्ष, अठ्ठावीस हजार फक्त) एवढा निधी राज्याच्या एकत्रीत निधीत जमा झाल्याबाबतची खात्री वाचा क्र.३ अन्वये वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडून करण्यात आलेली आहे.

०४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ९/२/२०१९ च्या अनौ.संदर्भ क्र. १५/विघयो व वित्त विभागाच्या दिनांक १५/०२/२०१९ च्या अनौ.संदर्भ क्रमांक ६०/२०१९ अन्वये सदर निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१११३११९५८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.03.14 17:20:40 +05'30'

(स्मि.स.राणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता).
३. विभागीय आयुक्त, सर्व.
४. उपायुक्त विकास, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
५. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
९. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१०.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
११.उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद, सर्व.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१३.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१४.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विघयो), मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग, (व्यय-३) मंत्रालय, मुंबई.
१६.कार्यासन क्र.पापु-०४, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.